# *राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक*

*(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)*

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील**

**क्र.रामाआ/नाशिक/द्वितीय अपील क्रमांक — ६३३/२०२२/अहमदनगर**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री.गोविंद रघुनाथ खपके,<br>रा.दवणगाव,<br>ता.राहुरी, जि.अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा,<br>निवासी नायब तहसिलदार,<br>तहसिल कार्यालय, राहुरी,<br>ता.राहुरी, जि.अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २ | प्रथम अपिलीय अधिकारी तथा,<br>तहसिलदार,<br>तहसिल कार्यालय, राहुरी,<br>ता.राहुरी, जि.अहमदनगर | : | प्रतिवादी |

**ऑनलाईन सुनावणी दिनांक — १०/०६/२०२२**

अपिलार्थी यांनी दि.१८/०१/२०२२ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिल दाखल केले असून त्यामध्ये त्यांनी माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी दि.१०/०६/२०२२ रोजी meet.google.com/qfw-eukk-ubv या गुगल मिट कोडद्वारे ऑनलाईन आयोजित करण्यात आली होती.

**सुनावणीसाठी उपस्थित**- सर्व पक्षकार उपस्थित होते.

अपिलार्थी यांनी दि.२६/११/२०२१ रोजीच्या माहिती अर्जान्वये श्री.धर्मा उर्फ अर्जुन किसन होन, रा.दवनगाव, ता.राहुरी यांच्या शिधापरित्रकेमध्ये नमूद सर्व सदस्यांची संपूर्ण नावे, वय व एकूण युनिट संख्या याबाबतची माहिती मिळण्याची विनंती केली होती. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीना दि.३०/११/२०२१ रोजीच्या पत्रान्वये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ११ (१) अन्वये त्रयस्थ व्यक्तिची माहिती पुरविता येत नाही, असे कळविले.

तद्नंतर अपिलार्थी यांनी दि.०६/१२/२०२१ च्या अर्जान्वये प्रथम अपिल दाखल केले. सदर प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी घेऊन दि.२८/१२/२०२१ रोजी निर्णय पारीत करुन जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य ठरवून प्रथम अपील अमान्य केले.

सुनावणीदरम्यानचा युक्तिवाद व आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता असे दिसून आले की, अपिलार्थी यांच्या दिनांक २६/११/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन तत्कालीन जन माहिती

अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस दिनांक ३०/११/२०२१ च्या पत्रान्वये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ११ (१) अन्वये त्रयस्थ व्यक्तिची माहिती पुरविता येत नाही, असे कळविल्याचे स्पष्ट होते. उपरोक्त बाब विचारात घेता अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाच्या कलम ७(१) अन्वये केलेली कार्यवाही योग्य असून प्रस्तुत अपिलात काहीही तथ्य नाही.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

द्वितीय अपील क्रमांक ६३३/२०२२/अहमदनगर अमान्य करण्यात येत असून निकाली काढण्यात येत आहे

**(समीर सहाय)**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

---

क्र.रामाआ-नाशिक/द्वि.अ.क्र.६३३/२०२२/अहमदनगर/ ओ- १६६४   दिनांक- १०/०८/2022